दोषींना मुक्ता करण्याच्या प्रकरणातील मूळ कागदपत्रे तयार ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला दिले होते. या आदेशाचा फेरआढावा घेण्यासाठी याचिका दाखल करण्याचा विचार करत असल्याचे केंद्र आणि सरकारने आज सर्वोच्च न्यायालयात सांगितले. न्या. के. एम. जोसेफ आणि न्या. बी.व्ही. नागरत्ना यांनी या प्रकरणातील अकरा दोषींना मंजूर करण्यात आलेल्या पॅरोलवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

रेल्वेची धडक बसून मडुऱ्यात तीन गवे ठार

पान १ वरून

मादी, दीड वर्षाचे वासरू जागीच ठार झाले तर एक मोठा गवा (अंदाजे पाच वर्ष) रेडा गंभीर जखमी झाला. जखमी गवा रेल्वे मार्गालगत असलेल्या काजू बागेत सुमारे चार तास ताटकळत होता. मात्र, धडक जोरात बसल्याने अखेर त्याने आपले प्राण सोडले.

वनविभागाचे सावंतवाडी वनक्षेत्रपाल मदन शिरसाळ, वनपाल नागेश खोराटे, वनरक्षक संग्राम पाटील, आप्पासो राठोड, चंद्रकांत पडते, ग्रामस्थ रामदास केणी यांनी मृत गव्यांचा पंचनामा करत विल्हेवाट लावली. दरम्यान, रेल्वे मार्गावर वन्य प्राण्यांचा वावर असल्याने संरक्षक जाळी बसविणे आवश्यक आहे. यासंदर्भात लवकरच पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांची भेट घेणार असल्याचे मडुरा उपसरपंच बाळू गावडे यांनी सांगितले

जळगाव @ ४५ अंश

पान १ वरून

हवामान अभ्यासक, वेलवेस वेदरचे संचालक नीलेश गोरे यांच्याकडे तापमानाची नोंद ४५ अंश नोंदली गेली. कडक उन्हामुळे नागरिक डोक्याला रुमाल, टोपी घालूनच बाहेर पडत आहेत.

जळगावमधील तालुकानिहाय तापमान असे

जळगाव- ४५ अंश सेल्सिअस, भुसावळ- ४५, अमळनेर- ४४, बोदवड- ४३, भडगाव- ४४, चोपडा- ४३, चाळीसगाव- ४२, धरणगाव- ४३, एरंडोल- ४४, फैजपूर- ४४, जामनेर- ४५, मुक्ताईनगर- ४४, पारोळा- ४३, पाचोरा- ४४, रावेर- ४४, वरणगाव- ४५, यावल- ४३ अंश सेल्सिअस.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

१३२/ब, भोसलेनगर, शिवाजीनगर, पुणे- ४११००७

फोन ०२०-२५५३८११९/२५५३८५१९ (कार्यालय), ई मेल : maueb@yahoo.co.in

– निवेदन –

महाराष्ट्रातील खासगी कृषि विद्यापीठांतील शैक्षणिक वर्ष २०२२-२०२४ च्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेमार्फत विविध ८९ विषयांकरिता मास्टर्स प्रवेश परीक्षा-२०२३ दि. २३-७-२०२३ ते दि. २४-७-२०२३ या कालावधीत घेण्यात निश्चित झाले आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया दि. १९-५-२०२३ ते दि. २-६-२०२३ या कालावधीत होणार आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठ व संलग्न परिषदेच्या http://www.mcaer.org या संकेतस्थळावर माहितीपुस्तिकेचे (PG-CET- 2023 Information Bulletin) अवलोकन करून ऑनलाईन अर्ज व संबंधित परीक्षा शुल्क भरावे.

दिनांक : १८-४-२०२३
स्थळ : पुणे

स्वाक्षरी/-
नियंत्रक
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

दाभोलकरप्रकरणी आता देखरेख नाही!

पान १ वरून

न्या. अजय गडकरी आणि न्या प्रकाश नाईक यांच्या खंडपीठापुढे याचिकेवर सुनावणी झाली. खंडपीठाने आरोपींची मागणी मंजूर केली आणि यापुढे तपासावर लक्ष ठेवणार नाही, असे स्पष्ट केले. आरोपींवर आरोपपत्र दाखल झाल्यानंतर न्यायालयाने यामध्ये देखरेख करू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, सध्या खटला सुरू आहे त्यामुळे आता तपासावर लक्ष ठेवणार नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले. सीबीआयच्या वतीने उच्च न्यायालयात अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह आणि ॲड. संदेश पाटील यांनी बाजू मांडली.

देखरेख प्रकरण काय?

आरोपपत्र दाखल झाल्यानंतर तपासावर न्यायालयाच्या देखरेखीची आवश्यकता नाही. या प्रकरणात आरोपपत्र दाखल होऊन खटला सुरू झाल्यामुळे सीबीआयच्या तपासावर न्यायालयाने देखरेख ठेवण्याची आणि याचिका प्रलंबित ठेवण्याची गरज नाही, असा दावा आरोपींच्या वतीने करण्यात आला होता. दाभोलकर कुटुंबीयांच्या वतीने या मागणीला विरोध करण्यात आला होता. हल्लेखोर आरोपी अटकेत असले, तरी मुख्य सूत्रधार कोण आहे, हत्यार, मोटारसायकल आदी तपशिलाची अद्याप माहिती नाही. त्यामुळे न्यायालयाने यापुढेही तपासावर नियंत्रण ठेवावे, अशी विनंती दाभोलकर कुटुंबीयांच्या वतीने ॲड. अभय नेवगी यांनी केली होती.

'आरपीएससी'च्या पदाधिकाऱ्यासह दोघांना अटक

जयपूर, ता. १८ : राजस्थानमध्ये २०२२मध्ये शिक्षक भरती परीक्षेदरम्यान पेपर फुटल्या प्रकरणी, राजस्थान लोकसेवा आयोगाच्या(आरपीएससी) एका पदाधिकाऱ्यासह दोघांना, राजस्थान पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले आहे. यात सहभागी व्यक्तींची पोलिस चौकशी करत आहेत.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

खुली ई – निविदा (एक लिफाफा पद्धत) मागविणारी सूचना

कामाचे नाव: गोवा आणि कर्नाटक राज्यामधील कोकण रेल्वे मार्गावरील कारवार क्षेत्राच्या अंतर्गत पेडणे ते ठोकूर अनुभागामध्ये 25 केव्ही एसी ओवर हेड इक्विपमेंट आणि पॉवर सप्लाय इंस्टॉलेशनचे देखभाल कंत्राट. **(सूचना क्र: केआर/सीओ/ईएल/एएमसी-टीआरडी/टी/3/23, दि. 19/04/2023). पूर्तता कालावधी:** चोवीस महिने. **अंदाजे मूल्य:** ₹ 6,25,48,653/- जीएसटी वगळता. **बोली सुरक्षा:** ₹ 4,62,800/- **निविदेच्या ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ:** 10/05/2023 रोजी 15.00 वा. पर्यंत. **उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** 10/05/2023 रोजी 15.30 वा. जोडपत्र / शुद्धिपत्रक जर असल्यास केवल आयआरईपीएस संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. **निविदा कागदपत्रांचे सादरीकरण:** आयआरईपीएस द्वारे. प्रत्यक्ष आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

चलनी नाणे असल्यामुळेच चर्चा : सुळे

पान १ वरून

असल्याचे विचारले तेव्हा त्या म्हणाल्या, ''अजित पवार हे विरोधी पक्ष नेते आहेत. त्यामुळे हे नेते त्यांच्या सोयीनुसार असणार. याबाबत काही व्हिडिओ असेल तर तो ही मला पाठवा, मगच मी त्यावर बोलेल. त्यामुळे केवळ सुरू असलेल्या चर्चांवर मी काहीच बोलणार नाही.''

सुळे म्हणाल्या, ''महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्या दरम्यान नागरिकांच्या मृत्यूची घटना ही दुर्दैवी आहे. तर राज्य सरकारने या मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली. पण पाच लाख रुपयांनी घरातील करता पुरुष किंवा स्त्री परत येणार नाही. त्यामुळे कुटुंबातील त्या व्यक्तीची किंमत पैशात मोजली जाऊ शकत नाही.''

खात्री केली तर कळेल...

राष्ट्रवादी पक्षातील काही आमदार नाराज असून अजित पवार भाजपसोबत जवळीक साधणार, या चर्चेवर त्या म्हणाल्या, ''मी पक्षातल्या सगळ्या आमदार-खासदारांशी बोलत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, अजित पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे आमदारांना, माध्यम आणि जनतेकरिताही नेहमी उपलब्ध असतात. त्यामुळे जर कोणी नाराज असेल, तर अर्थातच ते अडचणीत आमच्या कानावर आले असते. आपल्या कुटुंबातील एखादी व्यक्ती नाराज असते तेव्हा ती घर सोडून जात नाही. पवार साहेब नेहमी कायमी बोलतो असे सांगतात. माध्यमांनी खात्री केली तर, अजित पवार विधानभवनात काय करीत आहे, ते समजेल.''

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

जा.क्र./मनपा/PMAY/2023/14 दिनांक : १७/०४/२०२३

ई-निविदा सूचना (दुसरी वेळ)

आयुक्त महानगरपालिका, प्रधान मंत्री आवास योजना (ग.) घटक क्र. ३ प्रतिकृती क्र. ५ (DROH) अंतर्गत परवडणाऱ्या घरांचा खाजगी भागीदारी तत्त्वावर शासकीय जमिनीवर गृह प्रकल्प उभारणीसाठी खालील ४ ठिकाणी निविदा (RFP) मागविण्यात येत आहे. सविस्तर माहिती https://www.mahatenders.gov.in या पोर्टलवर दिनांक १८/०४/२०२३ ते ०३/०५/२०२३ पर्यंत उपलब्ध आहे.

अ.क्र.	ठिकाणाचे नाव	टेंडर आय.डी.	निविदा शुल्क	इसारा रक्कम
१	सुंदरवाडी गट क्र. ९, १०	2023_AMCA_883617_2	रु. 11,800/-	रु. ५०.०० लाख
२	तीसगाव गट क्र. २२५/१	2023_AMCA_883647_2	रु. 11,800/-	रु. ५०.०० लाख
३	तीसगाव गट क्र. २२७/१	2023_AMCA_883667_2	रु. 11,800/-	रु. ५०.०० लाख
४	पडेगाव गट क्र. ६९	2023_AMCA_883690_2	रु. 11,800/-	रु. २२.७० लाख

स्वाक्षरित
आयुक्त तथा प्रशासक,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

PUBLIC NOTICE OF AN AUCTION FOR SALE
PINKY SHIPYARD PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)
(CIN - U35111GA1991PTC001139)
Regd. Office.: Survey No. 209/2, Zorinto, Sancoale Village, Taluka Mormugao, Goa – 403 801

Notice is hereby given to the public in general in connection with sale of assets owned by Pinky Shipyard Private Limited (in liquidation) ("Corporate Debtor"), offered by the Liquidator appointed by the Hon'ble NCLT, Mumbai Bench vide order MA No. 1726/2019 in C.P. (IB) No. 1634/(MB)/2017 dated December 12, 2019 (date of receipt of order - December 13, 2019) under The Insolvency and Bankruptcy Code, 2016 ("Code").
The assets of Corporate Debtor, forming part of its liquidation estate, is being offered for sale. The bidding shall take place through online e-auction service provider Linkstar Infosys Private Limited at https://lsauctions.co.in/

SR. NO.	PARTICULARS	DETAILS
1	Date and Time of Auction	**Date:** Monday, May 22, 2023 **Time:** 11:00 a.m. to 4:00 p.m. (with unlimited extension of 5 minutes)
2	Address and e-mail of the Liquidator as registered with IBBI	**Reg. Address:** Naman Midtown, B Wing, 1106, 11th Floor, Behind Kamgar Kala Kendra, Senapati Bapat Marg, Elphinstone West, Mumbai City, Maharashtra, 400013. **Reg. Email Id:** ca.udayraj@vsjure.in **Process specific Email Id:** psplj@sumedhamanagement.com

Particulars of asset	Reserve Price (Amt. in Rs.)	Initial Earnest Money Deposit (Amt. in Rs.)	Incremental Value (Amt. in Rs.)
Block - I At Dapoli: Open land at Gut no. 94/20 (admeasuring 8296 Sq. Mtrs.) and Gut no. 94/2 (admeasuring 303 Sq. Mtrs) off State Highway number 96, Village Ulagaon, Taluka - Dapoli, Dist. Ratnagiri, Maharashtra- 415 706.	Rs. 8,66,000/- (Rupees Eight Lakhs Sixty-Six Thousand Only)	Rs. 86,600/- (Rupees Eighty-Six Thousand Six Hundred Only)	Rs. 10,000/- (Rupees Ten Thousand Only)
Block – II At Chicalim: Land at Survey No. 153/1 (admeasuring approx. 1,13,755 Sq. Mtrs.), known as "Sapal" Village Chicalim, Taluka - Mormugao, South Goa- 403711.	Rs. 5,50,09,125/- (Rupees Five Crore Fifty Lakhs Nine Thousand One Hundred Twenty Five Only)	Rs. 55,00,000/- (Rupees Fifty-Five Lakhs Only)	Rs. 1,00,000/- (Rupees One Lakh Only)

Important Notes:
1. The sale shall be on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER IT IS", "WHATEVER THERE IS" and "WITHOUT RECOURSE BASIS" and as such, the sale shall be without any kind of warranties and indemnities. The sale is conducted under the provisions of Code and the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016 made thereunder.
2. The details of the process and timelines of VDR access, site visit, due diligence etc. are outlined in the E-Auction Process Document. The said E-Auction Process Document will be available on the website of e-auction service provider Linkstar Infosys Private Limited from April 19, 2023. Address to the said website is: https://lsauctions.co.in/.
3. Interested bidders shall participate after mandatorily reading and agreeing to the relevant terms and conditions including as prescribed in E-Auction Process Document and accordingly, submit their expression of interest in the manner prescribed in E-Auction Process Document.
4. The Liquidator has the absolute right to accept or reject any or all offer(s) or adjourn/postpone/cancel/modify/terminate the e-Auction or withdraw any assets thereof from the auction proceeding at any stage without assigning any reason thereof.
5. As per proviso to sub-clause (f) of clause (1) of section 35 of Code, the interested bidder shall not be eligible to submit a bid if it fails to meet the eligibility criteria as set out in section 29A of Code (as amended from time to time).

Sd/-
Udayraj Patwardhan
IBBI/IPA-001/IP-P00024/2016-17/10057
Liquidator of Pinky Shipyard Pvt Ltd (in liquidation)
Authorisation for assignment no. – AA1/10057/02/110123/103761 (valid till January 02, 2024)
Date: April 18, 2023
Place: Mumbai

बेकायदा रेती व्यवसाय प्रकरणी ६५ गुन्हे नोंद

उच्च न्यायालयासमोर माहिती सादर

प्रतिनिधी
पणजी

बेकायदा रेती प्रकरणातील अवमान याचिकेवरील सुनावणीच्या वेळी पोलीस महासंचालक जसपाल सिंग यांनी प्रतिज्ञापत्र सादर करुन २०२२ पासून आतापर्यंत बेकायदा रेतीचे ६५ गुन्हे नोंद केल्याची माहिती उच्च न्यायालयासमोर दिली आहे परंतु पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई केली की नाही, याबाबत त्यांनी न्यायालयास काहीच कळविले नसल्याचे समोर आले आहे.

बेकायदा रेती काढण्याची प्रकरणे ज्या भागात घडली तेथील पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती न्यायालयाने मागितली होती. ती टाळण्यात आल्याचे दिसून आले आहे.

पोलीस महासंचालकांनी प्रतिज्ञापत्रातून दिलेली माहिती अशी की, २ जेसीबी मशीन, ५० वाहने व ११ होडी जप्त करण्यात आली आहे. एकूण ११२ आरोपींना अटक करून एकूण ४ प्रकरणात आरोपपत्रे दाखल करण्यात आली आहेत. एकूण १७ प्रकरणांची सध्या चौकशी चालू असून २६ वाहन चालक, १३ होडी मालक, ३० जमीन मालक, ३० कामगार व १ हॉटेल व्यवस्थापकावर कारवाई केल्याचे त्यात नमूद आहे. एकूण ९ रेती कंत्राटदारांवरही कारवाई केल्याची माहिती देण्यात आली असून कारवाई म्हणजे नेमके काय केली. याचा उल्लेख त्यात नाही. यापुढे बेकायदेशीर रेती काढण्याचे प्रकार होऊ नयेत म्हणून नजर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

हंप टाईप गतिरोधक उभारण्याचे आदेश

प्रतिनिधी, पणजी : दक्षिण गोवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मुरगाव येथे 'हंप टाईप' गतिरोधक उभारण्याचे आदेश दिले आहेत. एक गतिरोधक कासावलीहून कोलवाकडे जाणाऱ्या रस्त्यावर महेश कपूर यांच्या निवासस्थानासमोर, घर क्रमांक १०८, तकीरवाडो वेळसांव येथे. त्याचप्रमाणे दुसरा हंप टाईप गतिरोधक उभारण्याचे आदेश दिले आहेत.

पालिकेत येणाऱ्या लोकांची कामे वेळेवर करा

मडगाव नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांचे विभाग प्रमुखांना निर्देश : हेलपाटे घालायला लावू नका

प्रतिनिधी
मडगाव

मडगाव पालिकेत कामानिमित्त येणाऱ्या लोकांना हेलपाटे घालावे लागू नयेत, याची काळजी घेताना वेळेत कामे करून देण्याचे निर्देश नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी पालिकेच्या विविध विभागांच्या प्रमुखांना दिले आहेत. मंगळवारी नगराध्यक्ष शिरोडकर यांनी प्रशासकीय अधिकारी अभय राणे यांना घेऊन प्रशासकीय, कर, सॅनिटरी, लेखा विभागांना भेटी दिल्या. यावेळी उपनगराध्यक्षा दिपाली सावळ उपस्थित होत्या.

नगराध्यक्ष शिरोडकर यांनी विभाग प्रमुखांकडून त्यांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. जन्म आणि मृत्यू नोंदणी विभागासाठी एक संगणक तसेच लेखा विभागात एक खराब झालेला प्रिंटर बदलून त्वरित नवीन खरेदी करण्यासाठी स्टोअर किपरला निर्देश देण्यात आले. कर विभागात व्यापार व अन्य परवाने मिळविण्यासाठी येणाऱ्या लोकांना जास्त समस्या जाणवत असल्याच्या तक्रारी येत असल्याचे नगराध्यक्षांनी या विभागातील अधिकाऱ्यांना सुनावले.

कोणताही शेरा फाईलवर टाकण्याआधी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मत जाणून घ्यावे. त्वरित तोडगा काढून फायली हातावेगळ्या कराव्यात. फायली पडून राहिल्यास पालिकेचा महसूल बुडत असतो याचे भान ठेवावे, असे नगराध्यक्षांनी सांगितले. प्रशासकीय अधिकारी राणे यांना त्यांनी प्रक्रिया सुटसुटीत करून लोकांना दिलासा देण्यास सांगितले.

जन्म व मृत्यूच्या दाखल्यांसंबंधीच्या फायलींचा मोठा गठ्ठा पालिकेच्या पॅसेजमध्ये पडून आहे. त्यावर उपाय काढून त्या फायली सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची आवश्यकता अधिकाऱ्यांनी नगराध्यक्षांकडे बोलून दाखविली. काही कर्मचारी वेळेत कामावर येत नसल्याचे तसेच कामाच्या वेळेत कार्यालयाबाहेर पडत असल्याचे दिसून आल्याने नगराध्यक्ष शिरोडकर यांनी यापुढे कामानिमित्त कार्यालयाबाहेर जाणे भाग पडल्यास 'मूव्हमेंट रजिस्टर'वर त्याची नोंद करावी, असे निर्देश दिले आहेत.

मडगाव : जन्म आणि मृत्यूच्या दाखल्यांसंदर्भातील फाईल्स हाताळणाऱ्या प्रशासकीय विभागात पाहणी करताना नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर, उपनगराध्यक्षा दीपाली सावळ, लेखा अधिकारी अभय राणे व इतर.

गणवेष परिधान न करणाऱ्यांचा भत्ता रोखून धरण्याचे निर्देश

कित्येक पालिका कर्मचारी आणि अधिकारी गणवेष शिलाई तसेच तो धुण्यासाठी भत्ता घेत असले, तरी गणवेष परिधान करत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नगराध्यक्षांनी टिपणी टाकली असून मुख्याधिकाऱ्यांना यापुढे विनागणवेष आढळणाऱ्या अधिकारी वा कर्मचाऱ्यांच्या भत्त्याची रक्कम रोखून धरण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, कामचुकारांवर लक्ष ठेवण्यासाठी बंद असलेला यांत्रिकी हजेरीपट कार्यान्वित करून तो सक्तीचा करण्याची मागणी काही नगरसेवकांकडून करण्यात येत आहे.

नियमित चार ते पाच तास पाणीपुरवठा!

प्रतिनिधी
पणजी

गोव्यातील नागरिकांना दररोज ४ ते ५ तास पाणी देता येत नसेल तर याचा अर्थ राजकीय वर्ग यंत्रणा चालवण्याइतका सक्षम नाही, असे सार्वजनिक बांधकाममंत्री नीलेश काब्राल म्हणाले.

पणजीतील सायन्स फिल्म फेस्टिव्हला आले असता मंत्री नीलेश काब्राल पत्रकारांशी बोलत होते. 'जर आपण राजकीय वर्ग म्हणून ४ ते ५ तास पाणी देऊ शकत नाही आणि उद्दिष्ट २४ तासांपर्यंत वाढवू शकत नाही, तर आपण यंत्रणा चालविण्यास पुरेसे सक्षम नाही, असेही नीलेश काब्राल म्हणाले. लोकांनी किमान चार ते पाच तास पाणी देण्याचा प्रयत्न करणार त्यानंतर काही दिवसांत घरोघरी २४ तास पाणी देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असेही ते म्हणाले. लोकांनी पाठिंबा दिल्यास हे उद्दीष्ट नक्कीच साध्य होईल, असेही ते म्हणाले. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात काब्राल यांनी आश्वासन दिले होते की १५ एप्रिलपासून, प्रत्येक कुटुंबांना दिवसातून चार तास खात्रीपूर्वक पुरवठ्याची अपेक्षा आहे. या आश्वासनाबाबत विचारलेल्या प्रश्नाला काब्राल उत्तर देत होते.

डिचोली येथे युवतीच्या विनयभंग प्रकरणी मौलवीला अटक

प्रतिनिधी
डिचोली.

मुस्लीमवाडा डिचोली येथील एका २१ वर्षीय युवतीचा ती काम करीत असलेल्या डिचोली शहरातील एका सुपर मार्केटमध्ये जाऊन विनयभंग केल्या प्रकरणी डिचोली पोलिसांनी डिचोली औद्योगिक वसाहतीत राहणाऱ्या मन्नन अब्दुल इब्राहीम शेख (वय ३६) या मौलवीस अटक केली. ही घटना अत्यंत संतापजनक असून या प्रकरात सहभागी असलेल्या सदर मौलवीस कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी महिला समाजसेविका तारा केरकर यांनी केली आहे.

सदर घटना १६ एप्रिल रोजी दु. २.५० वा. घडली. डिचोली शहरातील एका सुपर मार्केटमध्ये काम करणाऱ्या सदर युवतीला मन्नन शेख याने जबरदस्ती करत तिच्यावर बळजबरी केली. या प्रकारानंतर सदर मन्नतने सदर युवतीच्या घरी जात तिला व तिच्या आईला धमकावले. पोलीस स्थानकात तक्रार केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर सदर युवतीने पोलीस तक्रार सादर केली. सदर युवतीचा महिला समाजकार्यकर्त्या तारा केरकर यांच्या उपस्थितीत जबानी नोंदविण्यात आली. या तक्रारीनुसार डिचोली पोलीस निरीक्षक सुरज गावस यांच्या मार्गदर्शनाखाली डिचोली पोलिसांनी संशयित मन्नन इब्राहीम अब्दुल शेख याला अटक केली आहे.

कपिलेश्वरी येथे दुचाकींची समोरासमोर धडक

दोन्ही दुचाकीस्वार जण गंभीर जखमी : एसटीपी चेंबरमुळे अपघातांचा धोका वाढला

प्रतिनिधी
फोंडा

कपिलेश्वरी येथे दोन दुचाकींमध्ये समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोन्ही दुचाकी चालक गंभीर जखमी झाले आहेत. त्यापैकी रणजीत शांताराम कवळेकर (२२, रा. महालक्ष्मीनगर, तळावली) याच्या डोके व पायाला गंभीर दुखापत झाली असून दीपराज दीपक देसाई (२१, रा. साखळी) हा दुसरा दुचाकी चालकही जखमी झाला आहे.

मंगळवारी सकाळी ११.१५ वा. रथामळ कपिलेश्वरी येथील वळणावर हा अपघात झाला. रणजीत हा जीए ०२ एन ३०७६ या क्रमांकाच्या ॲक्टिवा स्कूटरने तळावलीहून फोंड्याकडे तर दीपराज हा जीए ०२ एम ०७५३ या हिरो होंडा स्प्लेंडरने कवळेच्या दिशेने जात होता. रथामळ येथील वळणाजवळ दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. त्यात रणजीत याच्या डोके व पायाला जबर दुखापत झाली. दीपराज हाही जखमी झाला. दोघाही जखमींना १०८ रुग्णवाहिकेतून गोमेकॉत दाखल करण्यात आले. रणजीत याच्या डोक्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्याच्या पायावरही शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. फोंडा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला.

कपिलेश्वरी : रथामळ येथील वळणावर समोरासमोर धडकलेल्या दुचाक्या.

चेंबर्सची झाकणे ठरतात अपघातास कारणीभूत!

दरम्यान, ज्या ठिकाणी हा अपघात झाला, तेथे रस्त्याच्या एका बाजूला मलनिस्सारण प्रकल्पाच्या चेंबरचे लोखंडी झाकण आहे. त्याला चुकविण्याच्या प्रयत्नात दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. गेल्या सहा वर्षांपासून चेंबरच्या खोदकामामुळे या रस्त्यावर उंचवटे तयार झाले असून ते अपघातास कारणीभूत ठरत आहेत. अपघात टाळण्यासाठी कपिलेश्वरपासून दुर्भाटपर्यंतच्या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण करण्याची मागणी घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी केली.

मडगाव येथे घराला आग

प्रतिनिधी, मडगांव : मडगावच्या रवींद्र भवनजवळ असलेल्या एका घराला सोमवारी सायंकाळी आग लागली. आगीची माहिती मिळताच मडगाव अग्निशामक दलाचे जवान तातडीने घटनास्थळी गेले व त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. आग कशामुळे लागली याचे कारण कळू शकले नाही.

सांखळीतील लोकांचा आमच्या कामांवर विश्वास

दबावाच्या राजकारणातही आमचे पॅनल बाजी मारणार : धर्मेश सगलानी

प्रतिनिधी
डिचोली

सांखळी पालिका निवडणुकीसाठी आमच्या गटातील लोकांवर व आमच्या समर्थकांवरही सध्या मोठा राजकीय दबाव आहे. सामान्य नागरिकही ताणावात वावरत आहे. आमच्या पॅनलमार्फत निवडणूक लढविण्यास कोणी पुढे येत नसल्याने आपणास यावेळी दोन प्रभागांमध्ये उमेदवारी दाखल करावी लागली आहे. तरीही या निवडणुकीत आम्ही पूर्ण ताकद लावून लढणार आहोत. लोकांच्या विश्वासाच्या बळावर आम्ही या निवडणुकीत याहीवेळी यशस्वी होणार, असा विश्वास माजी नगराध्यक्ष धर्मेश सगलानी यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

काही प्रभागांमध्ये रिंगणात उतरण्यासाठी उमेदवारच तयार होत नाही, बाहेरून उमेदवार आयात केल्यास संबंधित प्रभागातील सूचक व अनुमोदक तयार होत नाही, अशी परिस्थिती आहे. निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी सध्या सांखळीत सुरू असलेले राजकारण व राजकीय दबाव यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. गेल्या निवडणुकीत आमच्या पॅनलमधून निवडून आलेले काही नगरसेवक अर्ध्यावरच आम्हाला सोडून भाजपात गेले. तर काही नगरसेवक आता गेले. जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणून नाव असलेला पक्ष आज सांखळीत आमच्या गटातील उमेदवार पळवत आहेत, ही लाजिरवाणी बाब आहे. त्यासाठीच सांखळीत सध्या काही भागांमध्ये नवीन उमेदवार उभे करण्यात आले आहेत. असेही सगलानी यांनी म्हटले.

धर्मेश सगलानी

सांखळी नगरपालिकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही नगराध्यक्ष धर्मेश सगलानी यांनी प्रथमच आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. आज मंगळवारी त्यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला.

साखळी नगरपालिकेत आमच्या टुगेदर फॉर सांखळी या पॅनलच्या नेत्यांनी सर्व प्रभागांमध्ये आवश्यक असलेली रणनीती आखत उमेदवार उभे केले आहेत. या प्रक्रियेत आपलाही छुपा सहभाग होता. पडद्यामागे राहून काम करताना आपण सर्व गोष्टींवर लक्ष ठेवून होतो. या नगरपालिका क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणात राजकीय दबाव, आमिषे असल्याने रणनीती ठरविताना मोठा गाजावाजा केला नाही, असेही धर्मेश सगलानी पुढे म्हणाले.

यावेळी लोक जरी शांत असले तरी गेली दहा वर्षे आम्ही केलेली कामे. सांखळीत साकारलेले विविध विकास प्रकल्प, लोकांना दिलेल्या सोयी यावर लोक आमच्या बाजूनेच राहणार. लॉकडाऊन व कोविड काळात लोकांना घरोघरी दिलेली सेवा लोकांच्या आजही मनात आहे. गेल्या दहा वर्षांत आमच्या गटाने कधीच सुडाचे राजकारण केले नाही. कोणाचे बरे करता येत नसल्यास वाईट कधीच केले नाही. या सर्व बाबी लक्षात ठेवून या निवडणुकीतही लोक आमच्या बाजूनेच राहतील, असा विश्वास सगलानी यांनी व्यक्त केला.

गोवा खंडपीठातील निवृत्त कर्मचाऱ्यांची सर्वोच्च न्यायालयात याचिका

प्रतिनिधी, पणजी : मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठातील निवृत्त कर्मचारी वर्गातील अनेकांना त्यांचे निवृत्ती वेतन व इतर लाभ गेली अनेक वर्षे न मिळाल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात पाठविलेले पत्र याचिका म्हणून दाखल करून घेण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी महाराष्ट्र – गोवा सरकारला नोटिसा बजावल्या असून स्पष्टीकरण मागितले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे गोवा खंडपीठ पणजी या गोवा राज्याच्या राजधानीत कार्यरत असून अलिकडेच ते पर्वरी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. तेथील अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना ५ वर्षे झाली तरी थकबाकी देण्यात आलेली नाही. त्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात पत्र पाठवले आणि ती याचिका आता सुनावणीस येणार आहे.

ट्रकच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी
मडगांव

मडगाव रेल्वे स्थानकाजवळ एका अज्ञात ट्रकची धडक बसल्यामुळे सुमारे ४० वर्षीय एक इसमाचा मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्रीनंतर एक पादचारी मडगाव रेल्वे स्थानक परिसरातून नावेलीच्या दिशेने जात असताना या अज्ञात ट्रकची पादचाऱ्याला धडक बसली.

या दुर्घटनेनंतर ट्रक चालक घटनास्थळी न थांबता वाहनासह पळून गेला. ज्या ट्रकची या इसमाला धडक बसली तो ट्रक आंध्र प्रदेशात नोंद केलेला असून पोलीस या ट्रक चालकाच्या शोधात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, पोलिसांना अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध मृत्यूस कारणीभूत ठरल्याने गुन्हा नोंद केला आहे.

कोमुनिदाद जमिनीवरील बेकायदा बांधकामांवरील कारवाई लांबणीवर

प्रतिनिधी
काणकोण

गोव्यात सध्या चालू असलेल्या 'जी२०' शिखर परिषदेच्या आरोग्य कार्य गटाच्या बैठकांत विविध देशांमधील अतिमहनीय व्यक्ती सहभागी झालेल्या आहेत. त्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवावा लागला असल्याने आगोंद येथील कोमुनिदादीच्या जमिनीवरील बेकायदेशीर बांधकाम हटाव मोहीम पुढे ढकलण्यात आली आहे.

वरील बैठकांसाठी जो बंदोबस्त ठेवण्यात आला आहेत त्यात काणकोण पोलीस स्थानकावरील पोलिसांनाही मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आले आहे. त्यामुळे कोमुनिदादीच्या जमिनीवरील बेकायदेशीर बांधकाम हटाव मोहिमेसाठी काणकोण पोलिसांचा पुरेसा फौजफाटा पाठविणे अशक्य असल्याचे पोलीस उपअधीक्षकांनी उपजिल्हाधिकारी आणि अतिक्रमण हटाव मोहिमेचे प्रमुख असलेल्या उदय प्रभुदेसाई यांना कळविले आहे. त्यानंतर प्रभुदेसाई यांनी २० एप्रिलपर्यंत ही मोहीम पुढे ढकलण्यात आली असल्याचे कळविले आहे.

१८ रोजी ही कारवाई मोहीम निश्चित करण्यात आली हाती. आगोंद पंचायत क्षेत्रातील वाल, पारवे, कराशिरमळ येथील कोमुनिदाद जमिनीवरील एकूण ७८ अनधिकृत बांधकामे पाडण्याचा आदेश दक्षिण गोवा कोमुनिदाद प्रशासकांनी दिलेला आहे. त्यादृष्टीने १८ रोजी मोहीम राबविण्याची सर्व ती तयारी काणकोणच्या उपजिल्हाधिकारी कार्यालयाने ठेवली होती. या अतिक्रमणांत गुंतलेल्यांमध्ये सध्या भीतीचे वातावरण पसरले आहे. २० नंतर नेमके काय घडते याकडे सर्वांच्या नजरा लागून राहिल्या आहेत.



CHANGE OF NAME

I, **Kanchana,** Spouse of **JC-458539H** Ex **Sub (Hony Lt) Kashinath Mahadeo Gawas** Resident of Vill- **Bodade (Omkarwadi)** Po-**Sateli Bhedshi** Teh - **Dodamarg** Dist - **Sindhudurg** (Maharashtra) **416512** Have changed my Name from **Kanchana to Kanchan Kashinath Gawas.** Vide affidavit dated **18 Apr 2023** before Executive Magistrate **Dodamarg** (Maharashtra)

CHANGE OF NAME

I, **Vidhya,** Spouse of **JC-273922P** Ex **Sub Desai Vilas** Resident of Vill- **Kudase** Po- **Kudase** Teh - **Dodamarg** Dist - **Sindhudurg** (Maharashtra) **416512** Have changed my Name from **Vidhya** to **Vidya Vilas Desai.** Vide affidavit dated **12 Apr 2023** before Executive Magistrate **Dodamarg** (Maharashtra)

VEHICLE FOR SALE

Model: **Bolero Camper Gold 2WD BSM/ MFG date: 6/2011/** Class: Goods Carrier, Body Type: Pickup, Fuel: Diesel, CC: 2573. Company: Mahindra & Mahindra Ltd. working good condition.
The prospective buyers are requested to send sealed quotation within Ten days to the Chairman Adarsh Krishi Kharedi Vikri Prakriya Sahakari Saunstha Maryadit, Near Railway Station, Balli-Goa. 403 703.
Phone: 7083309032. Email: info@adarshkrishi.in

दक्षिण गोवा जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, दक्षिण गोवा जिल्हा
माथानी साल्ढाना, प्रशासकीय संकुल,
स्थापना विभाग, कलेक्टोरेट बिल्डिंग, मडगाव–गोवा.
फोन नं. ०८३२–२७९४३२२, २७९४३२४, २७९४३२७ फॅक्स नं. ०८३२–२७९४४०२
वेबसाईट : www.southgoa.nic.in ईमेल : estab-cols.goa@nic.in
नं. १२/२५५/ईएसटी/भरती/२०२३ दिनांकित : १८.०४.२०२३

विषय : लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे ज्युनियर स्टेनोग्राफर, तलाठी, निम्नश्रेणी कारकून व मल्टी टास्किंग स्टाफच्या पदासाठी जाहिरात करण्यात आलेली लेखी/परिक्षा कौशल्य चाचणी कलेक्टोरेट (दक्षिण) यांनी पुढे ढकलली आहे.
संदर्भ : जाहिरात नं. १२/२५५/ईएसटी/भरती/२०२३ दिनांकित : १३.०४.२०२३

जाहीर सूचना

स्थानिक दैनिकांमध्ये म्हणजे १) ओ हेराल्डो २) तरुण भारत व ३) भांगरभुंय मध्ये १५.०४.२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या वरील संदर्भित जाहीर सुचनेनुसार जाहिरात क्र. १२/२५५/ईएसटी/भरती/२०१९ दिनांकित : २४.०४.२०१९ नुसार ज्युनियर स्टेनोग्राफर, तलाठी, निम्नश्रेणी कारकून व मल्टी टास्किंग स्टाफ अशा विविध वर्गांअंतर्गत गट 'सी' पदांसाठी दक्षिण गोवा जिल्हा कलेक्टोरेट, मडगाव येथे अर्ज केलेल्या सर्व पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, सदर पदांसाठी पूर्वी निर्धारित केलेली लेखी परीक्षा/कौशल्य चाचणी ही पुढे ढकलण्यात येत आहे. कारण द्वारा अधिसूचना नं. ४/३१/जीईएन–ईएलएन/एमसी/२०२३–२४/एसईसी/१३ दिनांकित ०८.०४.२०२३ नुसार फोंडा नगरपालिका मंडळासाठी सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून त्यामुळे आदर्श आचासंहिता लागू झाली आहे.
सदर जाहिरात सूचना नं. १२/२५५/ईएसटी/भरती/२०२३ दिनांकित : १३.०४.२०१९ नुसार विविध तारखांना निर्धारित असलेल्या लेखी परीक्षा/कौशल्य चाचणी प्रसिद्ध झाल्या त्या आता याद्वारे रद्द करण्यात येत आहे व नवीन तारखा वेगळ्या सूचित करण्यात येतील.

(ए. अश्विन चंद्रू आयएएस)
जिल्हाधिकारी दक्षिण गोवा
जिल्हा मडगाव–गोवा

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
खुली ई – निविदा (एक लिफाफा पद्धत) मागविणारी सूचना

कामाचे नाव: गोवा आणि कर्नाटक राज्यामधील कोकण रेल्वे मार्गावरील कारवार क्षेत्राच्या अंतर्गत पेडणें ते ठोकूर अनुभागामध्ये 25 केव्ही एसी ओवर हेड इक्विपमेंट आणि पॉवर सप्लाय इंस्टॉलेशनचे देखभाल कंत्राट. **(सूचना क्र: केआर/सीओ/ईएल/एएमसी-टीआरडी/टी/3/23, दि. 19/04/2023). पूर्तता कालावधी:** चोवीस महिने. **अंदाजे मूल्य:** ₹ 6,25,48,653/- जीएसटी वगळता. **बोली सुरक्षा:** ₹ 4,62,800/- **निविदेच्या ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ:** 10/05/2023 रोजी 15.00 वा. पर्यंत. **उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** 10/05/2023 रोजी 15.30 वा. जोडपत्र / शुद्धिपत्रक जर असल्यास केवल आयआरईपीएस संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. **निविदा कागदपत्रांचे सादरीकरण:** आयआरईपीएस द्वारे. प्रत्यक्ष आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

गोवा क्रीडा प्राधिकरण
पहिला मजला, पूर्व विंग, पहिला मजला,
ॅथलेटिक स्टेडियम, कुजिरा, बांबोळी–गोवा
फोन नं. ७०३०९४६१८३/८४ ईमेल:director@tsag.org.com
नं. एसएजी/एसीसीटीएस/जमात क्रीडा महोत्सव /२०२३–२४/ २०७ /
दिनांकित १८/०४/२०२३

निविदा सूचना
(फक्त ई–निविदा पद्धतीने)

गोवा क्रीडा प्राधिकरण, पणजी यांनी जमात क्रीडा महोत्सवासाठी क्रीडा साहित्याचा पुरवठा गोवा क्रीडा प्राधिकरण, पणजी – गोवा यांना करण्यासाठी ऑनलाईन निविदा मागविल्या आहेत.
क्रीडा साहित्याचा अंदाजित खर्च रू. ३०.५६ लाख
पूर्ण भरलेले निविदा दस्तऐवज ऑनलाईन सादर करण्याची शेवटची तारीख २६/०४/२०२३ संध्या. ३.०० वा. निविदा उघडण्याची तारिख २७/०४/२०२३ सायं. ३.३० वा.
सविस्तर निविदा सूचना व सहभागी होण्यासाठी कृपया ई–निविदा वेबसाईट (https://eprocure.goa.gov.in) ला भेट द्यावी.
कोणत्याही सहाय्यासाठी व माहितीसाठी तुम्ही खालील पत्त्यावर मेर्सेस इन्फोटेक कॉर्पोरेशन ऑफ गोवा यांच्याशी संपर्क करू शकता.
मेर्सेस इन्फोटेक कॉर्पोरेशन ऑफ गोवा,
आयटीहब, तिसरा मजला, आल्तिनो पणजी, गोवा ४०३००१
फोन : + ९१७९७२८५४२१३/ ७८२२०३९६७३/ ७९७२८७१९४४
ई–मेल : (https://eprocure.goa.gov.in)
निविदा दस्तऐवजातील कोणतीही जोडणी/गाळणी/ दुरूस्ती यासाठी फक्त (https://eprocure.goa.gov.in) वेबसाईटवरती शुद्धिपत्रक जारी केले जाईल.
कार्यकारी संचालक, गोवा क्रीडा प्राधिकरण यांनी त्याबाबतचे कोणतेही कारण स्पष्ट नकरता कोणतीही किंवा सर्व निविदा अंशत: किंवा पूर्णपणे स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
डीआय/जाहिरात/११३/२०२३

PUBLIC NOTICE OF AN AUCTION FOR SALE
PINKY SHIPYARD PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)
(CIN - U35111GA1991PTC001139)
Regd. Office.: Survey No. 209/2, Zorinto, Sancoale Village, Taluka Marmagoa, Goa – 403 601

Notice is hereby given to the public in general in connection with sale of assets owned by **Pinky Shipyard Private Limited** (in liquidation) ("Corporate Debtor"), offered by the Liquidator appointed by the Hon'ble NCLT, Mumbai Bench vide order MA No. 1726/2019 in C.P. (IB) No. 1634/(MB)/2017 dated December 12, 2019 (date of receipt of order - December 13, 2019) under The Insolvency and Bankruptcy Code, 2016 ("Code").
The assets of Corporate Debtor, forming part of its liquidation estate, is being offered for sale. The bidding shall take place through online e-auction service provider Linkstar Infosys Private Limited at https://eauctions.co.in/

SR. NO.	PARTICULARS	DETAILS
1	Date and Time of Auction	**Date:** Monday, May 22, 2023 **Time:** 11:00 a.m. to 4:00 p.m. (with unlimited extension of 5 minutes)
2	Address and e-mail of the Liquidator as registered with IBBI	**Reg. Address:** Naman Midtown, B Wing, 1106, 11th Floor, Behind Kamgar Kala Kendra, Senapati Bapat Marg, Elphinstone West, Mumbai City, Maharashtra, 400013. **Reg. Email Id:** ca.udayraj@viajure.in **Process specific Email Id:** pspl@sumedhamanagement.com

Particulars of asset	Reserve Price (Amt. in Rs.)	Initial Earnest Money Deposit (Amt. in Rs.)	Incremental Value (Amt. in Rs.)
Block - I At Dapoli: Open land at Gut no. 94/20 (admeasuring 8296 Sq. Mtrs.) and Gut no. 94/2 (admeasuring 303 Sq. Mtrs) off State Highway number 96, Village Usgaon, Taluka - Dapoli, Dist. Ratnagiri, Maharashtra- 415 706.	Rs. 8,66,000/- (Rupees Eight Lakhs Sixty-Six Thousand Only)	Rs. 86,600/- (Rupees Eighty-Six Thousand Six Hundred Only)	Rs. 10,000/- (Rupees Ten Thousand Only)
Block – II At Chicalim: Land at Survey No. 153/1 (admeasuring approx. 1,13,755 Sq. Mtrs.), known as 'Sapal' Village Chicalim, Taluka - Mormugao, South Goa- 403711.	Rs. 5,50,09,125/- (Rupees Five Crore Fifty Lakhs Nine Thousand One Hundred Twenty Five Only)	Rs. 55,00,000/- (Rupees Fifty-Five Lakhs Only)	Rs. 1,00,000/- (Rupees One Lakh Only)

Important Notes:
1. The sale shall be on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER IT IS", "WHATEVER THERE IS" and "WITHOUT RECOURSE BASIS" and as such, the sale shall be without any kind of warranties and indemnities. The sale is conducted under the provisions of Code and the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016 made thereunder.
2. The details of the process and timelines of VDR access, site visit, due diligence etc. are outlined in the E-Auction Process Document. The said E-Auction Process Document will be available on the website of e-auction service provider Linkstar Infosys Private Limited from April 19, 2023. Address to the said website is: https://eauctions.co.in/.
3. Interested bidders shall participate after **mandatorily** reading and agreeing to the relevant terms and conditions including as prescribed in E-Auction Process Document and accordingly, submit their expression of interest in the manner prescribed in E-Auction Process Document.
4. The Liquidator has the absolute right to accept or reject any or all offer(s) or adjourn/ postpone/cancel/modify/terminate the e-Auction or withdraw any assets thereof from the auction proceeding at any stage without assigning any reason thereof.
5. As per proviso to sub-clause (f) of clause (1) of section 35 of Code, the interested bidder shall not be eligible to submit a bid if it fails to meet the eligibility criteria as set out in section 29A of Code (as amended from time to time).

Sd/-
Udayraj Patwardhan
IBBI/IPA-001/IP-P00024/2016-17/10057
Liquidator of **Pinky Shipyard Pvt Ltd (in liquidation)**
Authorisation for assignment no. –
AA1/10057/02/110123/103761 (valid till January 02, 2024)
Date: April 18, 2023
Place: Mumbai